# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

**प्रसिद्धी पत्रक** **ता. १९ फेब्रुवारी २०१९**

## मनपातर्फे छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन

**नागपूर, ता. १९ :** छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त नागपूर महानगर पालिकेच्या वतीने महापौर नंदा जिचकार यांनी गांधी गेट महाल येथील शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला माल्यार्पण करून अभिवादन केले. उपमहापौर दीपराज पार्डीकर, माजी महापौर प्रवीण दटके, स्थायी समितीचे माजी सभापती बंडू राऊत, नगरसेविका सुमेधा देशपांडे, नेहा वाघमारे, हर्षला साबळे, संदीप सहारे यांनीही माल्यार्पण केले.

मनपा मुख्यालयातील मुख्य दालनातही महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तैलचित्राला माल्यार्पण करून अभिवादन करण्यातआले. यावेळी अपर आयुक्त रवींद्र ठाकरे, अपर आयुक्त राम जोशी, अपर आयुक्त अझीझ शेख यांनीही तैलचित्राला पुष्पहार अर्पण केला. यावेळी जनसंपर्क अधिकारी अशोक कोल्हटकर, राजेश वासनिक, भैय्यासाहेब बिघाने, शिवशंकर गौरे, मो. अंसारी, निलेश भनारकर, अजयसिंग ठाकूर, अनुप सवाईथूल यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.